# अज्ञात वाहनाच्या धडकेत अस्वल ठार

## अर्जुनी मोरगाव-सानगडी मार्गावरील घटना



**बोंडगावदेवी, १० :** अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत अस्वल ठार झाल्याची घटना अर्जुनी मोरगाव-सानगडी मार्गावर रविवारी (दि.११) दुपारी घडली. अर्जुनी मोरगाव ते सानगडी, निमगाव हा परिसर जंगल व्याप्त आहे. त्यामुळे या परिसरात नेहमीच वन्यप्राण्यांचा वावर असतो. तर गेल्या काही दिवसांपासून अस्वल आणि एका पट्टेदार वाघाचा वावर आहे. काही गावकऱ्यांना या अस्वल आणि वाघाचे सुद्धा दर्शन झाले आहे. रविवारी दुपारच्या सुमारास अर्जुनी मोरगाव ते सानगडी मार्गावर रस्ता ओलांडत असताना एका अज्ञात वाहनाने अस्वलाला जोरदार धडक दिली. यात अस्वलाचा घटनास्थळीच मृत्यू झाला. गावकऱ्यांच्या लक्षात ही बाब आल्यानंतर त्यांनी लगेच याची माहिती वनविभागाच्या अधिकाऱ्यांना दिली. माहिती मिळताच अर्जुनी मोरगावचे वनपरिक्षेत्राधिकारी एस. आर. कटरे आपल्या ताफ्यासह घटनास्थळी दाखल झाले. मृत अस्वलाचा पंचनामा केला. मृत अस्वलाचे शवविच्छेदन प्रकाष्ट निष्कासन अधिकारी एस. जी. अवगान यांच्या उपस्थितीत पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. समीर शेंद्रे यांनी केले. याप्रकरणी अज्ञात वाहनचालकावर वन कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे.

# अधुरा सपना पुरा करेंगे...' वांडोली चकमकीनंतर नक्षल्यांची आगपाखड!

**गडचिरोली, १० :** छत्तीसगड सीमेवरील वांडोलीच्या घनदाट जंगलात माओवादी व पोलिसांतील चकमकीत १२ माओवादी ठार झाले होते. या घटनेनंतर तीन आठवड्यांनी १० ऑगस्ट रोजी पत्रक जारी करुन 'अधुरा सपना पुरा करेंगे...' असा टोकाचा इशारा दिला आहे. लोहखनिजावर सरकारचा डोळा असून कवडीमोल दराने ते विकण्याचा घाट असल्याचा आरोप करत आगपाखड केली आहे. एटापल्ली तालुक्यातील जारावंडी ठाणे हद्दीत १७ जुलै रोजी वांडोली गावानजीक सी-६० जवान व नक्षलवाद्यांमध्ये चकमक उडाली होती. यात तीन मोठ्या नेत्यांसह कसनसूर,कोरची,टिपागड, चातगाव दलमलचे १२ नक्षलवादी ठार झाले होते. या चकमकीनंतर उत्तर गडचिरोलीतील नक्षलवादी चळवळ संपुष्टात आल्याचे पोलिसांनी जाहीर केले होते. त्यानंतर तब्बल २३ दिवसांनी नक्षलवाद्यांच्या पश्चिम सब झोनल ब्युरोचा प्रवक्ता श्रीनिवास याने १० ऑगस्ट रोजी पत्रक जारी केले आहे. यामध्ये चकमकीत ठार झालेल्या नक्षलवाद्यांच्या नावाचा उल्लेख असून चकमकीवर प्रश्न उपस्थित करून राज्य सरकारला लक्ष्य केले आहे. जिल्ह्यात असलेले मौल्यवान खनिज देशातील आणि विदेशातील उद्योगपतींना कवडीमोल दरात देण्याचा घाट असल्याचा दावा केला आहे. १७ जुलै रोजी अहेरी तालुक्यातील वडलापेठ येथे



उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योग मंत्री उदय सामंत लोह प्रकल्पाच्या भूमिपूजनासाठी आले होते. नेमकी त्याच दिवशी संधी साधून ही चकमक घडविण्यात आली, असा आरोपही पत्रकात करण्यात आला आहे. ठार झालेल्या नक्षलवाद्यांचे मृतदेह अंत्यसंस्कारासाठी सन्मानपूर्वक नातेवाईकांना द्यावेत, अशी मागणीही केली आहे.

वांडोली चकमकीनंतर मृत नक्षलवाद्यांच्या नातेवाईकांशी संपर्क केला. आतापर्यंत ९ नक्षलवाद्यांचे मृतदेह त्यांच्या कुटुंबीयांना स्वखर्चातून सुपूर्द केले आहेत. उर्वरित तीन नक्षलवाद्यांचे मृतदेह छत्तीसगडमधील असून त्यांच्या नातेवाईकांना संपर्क करण्यात आला आहे. त्यांचा निरोप येतात हे देखील मृतदेह पोहोचवून देण्यात येतील. नक्षल्यांची चोहोबाजूंनी कोंडी झाली आहे, त्यामुळे नैराश्येतून ते आरोप करत आहेत.

-नीलोत्पल, पोलिस अधीक्षक, गडचिरोली

# हत्तीरोग बाधितांना अपंगत्वाचे प्रमाणपत्र द्या




**बुलढाणा, १० :** महाराष्ट्रासह देशातील लाखो हत्तीरोग बाधितांना ४५ टक्के अपंगत्वाचे प्रमाणपत्र देण्याचे निर्देश केंद्रीय आरोग्य, आयुश, कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी देशातील आरोग्य यंत्रणांना आज दिले. याचा शुभारंभ बुलढाण्यातून करण्यात आला. जिल्ह्यातील एका हत्तीरोग बाधित महिलेला आरोग्य राज्यमंत्र्यांच्या हस्ते आज अपंगत्वाचे प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.

हत्तीरोगाच्या दुरीकरणासाठी सार्वत्रिक औषधोपचार मोहीमेचा शुभारंभ आज राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते दूरदृष्य प्रणालीद्वारे करण्यात आला. मेहकर येथील महाराष्ट्र अर्बन बँकेच्या सभागृहात हा कार्यक्रम पार पडला. या शुभारंभपर कार्यक्रमात केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाच्या सचिव वंदना यांच्यासह बिहार, झारखंड, ओडीसा, कर्नाटक, तेलंगणा, उत्तर प्रदेश, या राज्याचे आरोग्यमंत्री तसेच ग्रामविकास, कृषी महिला व बाल कल्याण, शिक्षण, अल्पसंख्याक मंत्रालयाचे वरिष्ठ अधिकारी बैठकीत सहभागी झाले. दृकश्राव्य पद्धतीने या बैठकीत सहभागी झालेल्या अधिकाऱ्यांना यावेळी जाधव यांनी मार्गदर्शन केले. यावेळी ते म्हणाले की, महाराष्ट्रासह देशातील तब्बल राज्य आणि केंद्रशासित प्रदेशात हत्तीरोगाचा प्रादुर्भाव आहे. या राज्यांत लिम्फैटिक फाइलेरियासिस अर्थात हत्तीरोगाचे साडेसात लाख रुग्ण असल्याचे आढळून आले आहे.

# साफसफाईवर महिन्याला तीन कोटी खर्च

## मग या घाणीला जबाबदार

**अमरावती, १० :** सुमारे दहा लाख अमरावतीकरांचे प्रतिनिधित्व करणारी महापालिका शहर स्वच्छतेवर महिन्याकाठी सुमारे कोटी रुपये खर्च करते. शहरातून दैनंदिन निघणारा कचरा व हॉटेल वेस्टदेखील सुकळी कंपोस्ट डेपोत नेऊन टाकणे बंधनकारक आहे. त्यासाठी महापालिका आस्थापनेवर सुमारे ६५० च्या आसपास सफाई कामगारांसह कंत्राटदारांचे देखील कामगार आहेत. तरीदेखील शहरातील अनेक रस्ते गार्बेज कलेक्शन सेंटर बनले आहेत. दैनंदिन कचरा संकलन व स्वच्छतेसाठी झोननिहाय पाच कंत्राटदार नेमले गेले आहेत. त्यांच्या वतीने शहरात घंटागाडीद्वारे कचरा संकलन केले जाते.

कशासाठी किती खर्च

कचरा संकलन : झोननिहाय पाच कंत्राटदारांवर महिन्याकाठी एकूण दोन ते २.२५ कोटी रुपये खर्च केले जातात. कचरा प्रक्रिया: सुकळी व अकोली रोड येथे कचऱ्यावर प्रक्रिया केली जाते. त्यावर देखील खर्च होतो. कचरा वाहतूक : शहरातून दैनंदिन संकलित होणारा कचरा सुकळी कंपोस्ट डेपोत नेला जातो.

### साफसफाईवर पालिकेचा महिन्याला तीन कोटींचा खर्च

महापालिकेच्या स्वच्छता विभागाकडून शहर स्वच्छतेवर दर महिन्याला सुमारे तीन ते सव्वातीन कोटी रुपये खर्च होतो. रस्त्यांवरही घाण शहरातील अनेक रस्त्यांवर, रस्त्यांशेजारी कचऱ्याचे ढीग आढळून येतात. अंतर्गत रस्त्याची देखील तीच स्थिती आहे. खुल्या




प्लॉटमध्ये देखील कचरा टाकला जातो. पाचही प्रभागात मोहीम सुरू पाच झोननिहाय कंत्राटदारांच्या माध्यमातून शहराची स्वच्छता केली जाते. घंटागाडीद्वारे दैनंदिन कचरा संकलन करणे बंधनकारक आहे. गेल्या आठवड्यापासून शहरात विशेष स्वच्छता मोहीम हाती घेतली आहे. त्यात लोकसहभाग देखील महत्त्वाचा आहे.

डॉ. अजय जाधव. स्वच्छता विभाग प्रमख

कचरा दररोज उचलला जातो का ?

घंटागाड्यांच्या माध्यमातून कचरा संकलन केला जातो. तो ट्रक व कंटेनरच्या माध्यमातून सुकळी कंपोस्ट डेपोत नेऊन टाकला जातो. मात्र शहरातील अनेक भागात घंटागाड्या दररोज येत नसल्याची ओरड आहे. कुठे एक दिवसाआड तर दोन, तीन दिवसांनी घंटागाड्या येत असल्याची ओरड आहे.

# अवैध फलकामुळे अपघात शिक्षिकेचा जागीच मृत्यू

**गोंदिया, १० :** गोंदिया शहरातील रामनगर पोलीस ठाण्यां अंतर्गत येत असलेल्या कुडवा जवळील राणी अवंतीबाई चौकात एक शिक्षिकेच्या दुचाकी वाहनाला एका भरधाव ट्रकने धडक दिल्याने शिक्षिकेचा जागीच मृत्यू झाला. सोमवारी सकाळी ८.३० वाजताच्या सुमारास ही घटना घडली. एका प्रत्यक्षदर्शी ने सांगितलेल्या माहितीनुसार सदर भरधाव ट्रक ने महिला शिक्षिकेला काही अंतरापर्यंत चिरडत नेले यात शिक्षिकेच्या शरीराचा अक्षरश: चेंदामेंदा झाला. अल्विना जेम्स लुईस वय ३१ वर्ष रा. अरिहंत कॉलोनी कुडवा,गोंदिया असे मृत शिक्षिकेचे नाव आहे. ही शिक्षिका गोंदिया इथून अंभोरा येथील शाळे मध्ये जात असताना अवंतीबाई चौक या ठिकाणी तिरोडा कडून बालाघाट टी पॉईंट कडे जात असताना अवंतीबाई चौक या ठिकाणी एका भरधाव ट्रकने धडक दिल्याने शिक्षकेचा जागीच मृत्यू झाला. या अपघातानंतर काही काळासाठी परिसरात तणावाचा वातावरण निर्माण झाला होता. घटनास्थळी एकत्र झालेले नागरिक शहरातील वाहतूक व्यवस्था आणि या चौकात लावण्यात आलेल्या अवैध फलका मुळे वळण घेताना निर्माण झालेलीअदृश्यता ला कारणीभूत ठरवीत होते. तणाव वाढत असताना मात्र रामनगर पोलिसांनी घटना स्थळी धाव घेत ट्रक व चालक याला ताब्यात घेतल यामुळे हा तणाव निवळला आहे. घटना स्थलावरुन शिक्षिकेचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी के.टी. एस. जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठवण्यात आले आहे. या अपघातानंतर या चौकातील परिस्थिती बघितली असता या राणी अवंतीबाई चौक परिसरात मोठ्या प्रमाणात तथाकथीत एका युवा नेत्यांचे वाढदिवस शुभेच्छा देणारेअनधिकृत फलक लागले असून या फलकामुळे या चौकातून वळण घेताना दुसरीकडून येणारे वाहन दिसून येत नाही. त्यातच या चौकात असलेला सहयोग हॉस्पीटलच्या बाजूने असलेल्या भागातही मोठ्या प्रमाणात मुख्य रस्त्यावर वाहने ठेऊन अर्धा रस्ता व्यापला जातो.

# देवेंद्र फडणवीस यांच्या सुरक्षेत पुन्हा चूक

## नेमकं काय घडलं ?

**अकोला, १० :** उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अकोला दौऱ्यादरम्यान सुरक्षा यंत्रणेत मोठी चूक झाल्याचा आरोप होत आहे. नियोजित कार्यक्रमानंतर देवेंद्र फडणवीस आपल्या वाहनाने थेट महामार्गाकडे निघाले. देवेंद्र फडणवीस पुढे गेल्यानंतरही त्यांचा सुरक्षा ताफा मात्र मागेच राहिला होता. हे लक्षात आल्यावर पोलिसांची मोठी धावपळ झाली. यापूर्वी देखील देवेंद्र फडणवीस यांच्या सुरक्षा ताफ्यात चुकीचा प्रकार घडला होता.



भारतीय जनता पक्षाच्या विस्तारीत कार्यकारिणीच्या बैठकीत उपस्थित राहण्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा भाजप नेते देवेंद्र फडणवीस रविवारी दुपारी अकोला दौऱ्यावर आले होते. शिवणी विमानतळावर दुपारी १.२० वाजताच्या सुमारास त्यांचे आगमन झाले. यावेळी खासदार अनुप धोत्रे, आमदार डॉ. संजय कुटे, आमदार श्वेता महाले आदी उपस्थित होते. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या सभागृहात पक्षाची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला देवेंद्र फडणवीस यांनी संबोधित केले. आपल्या भाषणादरम्यान देवेंद्र फडणवीस यांनी खोटारडेपणाचा आरोप करून विरोधकांचा खरपूस समाचार घेतला. कार्यकर्त्यांनी समाजमाध्यमांवर सक्रिय राहण्याच्या सूचना देखील फडणवीस यांनी केल्या आहेत. दरम्यान, नियोजित बैठक दुपारी पार पडल्यानंतर देवेंद्र फडणवीस आपल्या वाहनाने निघाले. देवेंद्र फडणवीस आपल्या वाहनातून कृषी विद्यापीठाच्या विश्रामगृहात जातील, असा पोलिसांचा अंदाज होता. मात्र, पोलिसांचा अंदाज चुकवत देवेंद्र फडणवीस आपल्या वाहनातून थेट महामार्गाकडे रवाना झाले. त्यांना शिवणी विमानतळावरून नागपूरकडे प्रयाण करायचे होते. देवेंद्र फडणवीस महामार्गाकडे रवाना झाल्यावरही पोलिसांच्या गाड्या विद्यापीठ परिसरातच होत्या. हे कळताच सुरक्षा ताफ्यात नियुक्त पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये एकच खळबळ उडाली. पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी धावपळ करून देवेंद्र फडणवीस यांच्या वाहनामागे आपल्या गाड्या पळवल्या. देवेंद्र फडणवीस यांचे वाहन पुढे, तर त्यांच्या ताफ्यातील सुरक्षा यंत्रणेच्या गाड्या मागे, असे चित्र निर्माण झाले होते. राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सारख्या अत्यंत महत्त्वाच्या नेत्याच्या सुरक्षा यंत्रणेत मोठी चूक झाल्याचे समोर येत आहे. या प्रकारावरून पोलिसांवर टीका होत आहे. दरम्यान, यापूर्वी देखील अकोल्यात देवेंद्र फडणवीस यांच्या सुरक्षा ताफ्यात चूक झाल्याचा प्रकार घडला होता. अकोला दौऱ्यावर असतांना देवेंद्र फडणवीस यांच्या सुरक्षा व्यवस्था व ताफ्याच्या नियोजनात दरवेळी चूक कशी होते? असा प्रश्न यानिमित्ताने निर्माण झाला आहे.

# वाघाच्या हल्ल्यात गुराखी ठार



**चंद्रपूर, १० :** मुल तालुक्यातील केळझर येथील गुराखी गणपत लक्ष्मण मराठे (६९) वनपरिक्षेत्र चीचपल्ली, उपक्षेत्र केळझर येथील कक्ष क्रमांक ४३१ मध्ये गुरे चराईसाठी गेले असता जंगलात दबा धरून बसलेल्या वाघाने हल्ला करून ठार केले. ही माहिती शुक्रवारी रात्री उशीरा मिळाल्याने व गुराखी घरी न आल्यामुळे शनिवारी सकाळी वनविभागाने शोध मोहीम राबवली. त्यानंतर जंगलात गुराख्याचा मृतदेह मिळाला.


**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) for following

| S.N. | Tender No. & Description |
|---|---|
| 1 | RFx. No. 7000032705; Supply of 33kV 1600-800/1A 4C, 800-400/1A 3C CTS and 33KV PT under Nagpur Zone EMD Rs 22,283.57/- & Tender Fees: Rs.500/- (GST extra) |

Tenders Available at: https://srmetender.mahatransco.in; Due date for online submission upto: 19.08.2024 15:00Hrs; Tender Opening 19.08.2024 16:00 Hrs if possible.

--sd--

Chief Engineer EHV PC O&M Zone Nagpur.



**एल&टी फायनान्स लिमिटेड**
(आधीचे नाव, एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड)
**नोंदणीकृत कार्यालय:** एल&टी फायनान्स लिमिटेड, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरुम जवळ, सांताक्रूझ (पू), मुंबई 400 098
**CIN No.:** L67120MH2008PLC181833
**शाखा कार्यालय:** नागपूर

L&T Finance

## गहाण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी सार्वजनिक लिलाव

एल अँड टी फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, 2002 [54 ऑफ 2002] आणि या कायद्यांतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तेचा लिलाव करत आहे. **"आधार कुठे आहे" आणि "जशी स्थिती आहे तशी"** त्याची देय रक्कम आणि पुढील व्याज, शुल्क आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **"सार्वजनिक लिलाव"** च्या मार्गाने.

| कर्जदार आणि सह-कर्जदाराचं नाव | तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता | कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक) | भौतिक ताबा घेतला | बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये) | एकूण शिल्लक थकबाकी 25.06.2024 नुसार | आरक्षित किंमत (रुपयांमध्ये) | आरंभाची तारीख | लिलावाची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. मेसर्स पुर्वी एंटरप्रायझेस (त्याचे प्रोप्रायटर शंकर सुंदरदास मोटवानी यांच्या तर्फे) 2. शंकर सुंदरदास मोटवानी 3. कृतिका शंकर मोटवानी | मालमत्तेच्या पत्त्याचे सर्व तुकडा आणि पार्सल: पहिल्या मजल्यावर फ्लॅट क्रमांक C-1 चा समावेश असलेली सर्व आरसीसी सुपर स्ट्रक्चर, सुपर बिल्ट अप एरिया 55.76 चौ. मीटर्स, महालक्ष्मी अपार्टमेंट नंबर 1 म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आणि शैलीत असलेल्या इमारतीत भूखंड क्रमांक 506 वर बांधण्यात आले आहे, एकूण क्षेत्रफळ 450 चौ. मीटर (4843.8 चौ. फूट), येथे संपूर्ण जमिनीचा एक भाग असल्याने. क्रमांक 7, 9 आणि 10/1-2 मौजा इंदोरा, नागपूरच्या पाचपोली गृहनिर्माण योजनेतील - इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट, बेअरिंग सिटी सर्व्हे क्रमांक 15 आणि पत्रक क्रमांक 14, एनआयटीच्या मर्यादेत आणि एनएमसी बेअरिंग एनएमसी घर क्रमांक 3448/ए/डी/506/सी-1 प्रभाग क्रमांक 57, तहसील आणि जिल्हा नागपूर एकत्र 6.49% विभक्त वाटा आणि सांगितलेल्या जमिनीतील व्याज आणि सीमाबद्ध आहे खालीलप्रमाणे:- | H1775425062101 2015/ H1775425062101 2015L/ NGPHL20000104 | 28 मे 2024 | रु. 2,96,019.10 | रु. 59,74,259.61 | रु. 29,60,191 | सर्व कामकाजाच्या दिवशी भेटीची वेळ निश्चित करून | सकाळी 10 ते संध्याकाळी 5:30 29-08-2024 |

| सीमा | | |
|---|---|---|
| | पूर्व | 9.00 मीटर रुंद रस्ता |
| | पश्चिम | पहिल्या मजल्यावर फ्लॅट क्रमांक बी-1 |
| | उत्तर | प्लॉट क्र. 505 |
| | दक्षिण | पहिल्या मजल्यावर फ्लॅट क्र. D-1 |

### सार्वजनिक लिलावाच्या अटी आणि नियम

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.E-auctiontiger.net वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई-लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना 28/08/2024 रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुराव्यांच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10% परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTHF द्वारे सदर जाहीर ई-लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे 29/08/2024 रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे 30/08/2024 भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुदींनुसार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेची तपासणी करण्यासाठी किंवा अधिक माहितीसाठी, संभाव्य बोलीदार अधिकृत अधिकाऱ्यांशी संपर्क साधू शकतात म्हणजे, **संजय अग्रवाल संपर्क क्रमांक 9981146636 आणि संतोष तिवारी, संपर्क क्रमांक 9920490126, एल&टी फायनान्स लि., - ऑफिस: 6 वा मजला, वृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं 177, कलिना, CST रोड, मर्सिडीज शोरूम जवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - 400 098** कोणत्याही ई-लिलावाच्या टप्प्यावर, अधिकृत अधिकारी कोणतेही कारण न देता आणि कोणतीही पूर्वसूचना न देता बोली/ऑफर स्वीकार/नाकारू/सुधारू/रद्द करू शकतो किंवा लिलाव पुढे ढकलू शकतो.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करून घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8 (6) खाली वर उल्लेखित जाहीर ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक)/सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

स्वाक्षरी/-
**अधिकृत अधिकारी**
करिता एल&टी फायनान्स लिमिटेड

**दिनांक:** 13.08.2024
**ठिकाण:** नागपूर


## सरला कापसे यांच्या 'गगनभरारी' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन

**देवळी, १०:** बंधुता लोकचळवळीच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त विश्वबंधुता साहित्य परिषद आणि भारतीय जैन संघटनेचे कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय वाघोली, पुणे या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने ऐतिहासिक पहिले विश्वबंधुता विद्यार्थी आणि शिक्षक साहित्य संमेलनामध्ये देवळी येथील सृजन इंग्लिश मीडियम स्कूलच्या शिक्षिका.सरला अजय कापसे यांच्या 'गगनभरारी'या काव्यसंग्रहाचे वाघोली येथे थाटात प्रकाशन झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.सविता पाटील, स्वागताध्यक्ष सुरेश साळुंके,तर उद्घाटक डॉ.अविनाश सांगोलेकर इत्यादी श्रेष्ठ मंडळी होती.या कार्यक्रमांमध्ये सौ सरला कापसे यांच्या काव्य संग्रहातून प्रकाशन करण्यात आले.यावेळी प्रकाश रोकडे,व जेष्ठ साहित्यिक चंद्रकांत वानखेडे,यांनी काव्य संग्रहाबद्दल स्तुती केली. अमोल सावरकर, मार्गदर्शक चंद्रकांत वानखेडे,व या पुस्तकाचे प्रकाशक राहुल कुलकर्णी.


**NAGPUR MUNICIPAL CORPORATION**
**Offline Tender Notice**

Commissioner NMC invites Offline Tenders for the following work. These Offline Tenders can be Submitted by the Registered Contractors of NMC . The terms and conditions of Offline Tenders are available in the Tender Form. The sale and purchase of Tender Form can be done from Office of The Garden Superintendent, Garden Department 6 th Floor 'C' Wing NMC Civil Lines Nagpur .

| Tender No. | Name of the work | Project Cost | EMD |
|---|---|---|---|
| 85-2024/OT | Providing and Erecting chainlink fencing & plantation of tree at Nagsenvan Garden, Vinoba Bhave Nagar | Rs. 4,16,230/- | Rs. 4,500/- |
| 86-2024/OT | Repairing, Painting & Installing benches and FRP Ghoda Gadi with MS at Traffic Park Garden Dharampeth | Rs. 4,18,547/- | Rs. 4,200/- |
| 87-2024/OT | Providing and Fixing play equipment at Narmada Colony Garden, Shende Nagar Garden and Nandanvan Colony near Police Station Garden | Rs. 8,44,700/- | Rs. 8,500/- |
| 88-2024/OT | Construction of toilet block and miscellaneous civil works at Shastri Layout Garden Subhash Nagar | Rs. 6,64,864/- | Rs. 7,000/- |
| 89-2024/OT | Providing and fixing information board at various NMC & NIT Garden in Nagpur City | Rs. 8,26,419/- | Rs. 8,500/- |
| 90-2024/OT | Various Civil works at Nandanvan Garden Nandanvan | Rs. 4,48,091/- | Rs. 5,000/- |

**Note : (1)** Time Period : 02 Months, Cost of Blank Quotation Form : Rs.500 + 90 (GST) = 590/- , Class of Contractor : 1 To 8 N.M.C. Registered Contractor. **(2)** Submission End Date (15:00 P.M) : 22.08.2024. **(3)** Opening Date (If Possible 16:00 pm.) : 23.08.2024. **(4)** Right to reject any or all Offline Tenders without assigning any reasons there of is reserved by the Municipal Commissioner N.M.C. Nagpur. **(5)** Eligibility criteria and mode of submission shall be as stated in Tender Form.

**Advt No : 294/PR,**
**Dt : 12/08/2024**

**Garden Superintendent**
**Nagpur Municipal Corporation, Nagpur**